# प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या गोष्टी




ऐसा उत्तम गुणी विशेष ।
तयास म्हणवावे पुरुष ।
जयाच्या भजनी जगदीश ।
तृप्त होये ।

॥श्रीराम॥

# प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या गोष्टी

॥श्रीराम॥

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

**प्रकाशन दिवस**
माघ वद्य ६, शके १९३१
गुरुवार, ४ फेब्रुवारी २०१०

**मुखपृष्ठ आणि रेखाचित्रे**
सुरेंद्र शिंदे

**मुद्रक**
रमा एन्टरप्रायजेस
३९, स्वामी समर्थ नगर,
बंडू गोखले पथ, गिरगांव,
मुंबई – ४०० ००४.
दूरध्वनी–२३८५ २८४६
भ्रमणध्वनी–९३२३२९१०३४

**प्रकाशक**
श्रीभगवती प्रकाशन
श्रीदत्त आश्रम संस्थान
प. पू. श्री दत्त महाराज कवीश्वर मार्ग,
सद्गुरुनगर, जालना – ४३१२०३
फोन – ०२४८२–२३६८०५

॥श्रीराम॥

# अनुक्रमणिका

## 'सर्वांसाठी'


**कवीश्वर घराणे** पान क्र

प. पू. दत्तमहाराजांचे आजोबा–प. पू. श्री वक्रतुंड महाराज ०१

प. पू. दत्तमहाराजांच्या आजी–प. पू. सौ. सावित्रीबाई ०३

प.पू. दत्तमहाराजांचे वडील–प. पू. श्री धुंडीराजशास्त्रीमहाराज ०४

प. पू. दत्तमहाराजांच्या आई–प. पू. सौ. सरस्वतीबाई ०६

**गोष्टी**

असे होते महाराज! ०८

असे सांगत महाराज! १०

दया तिचे नाव । भूतांचे पालन ११

देव एकच आहे १४

बहुभाषिक महाराज १५

''गुणवंताचे गुण घ्यावे'' १७

कर्मनिष्ठा १९

''ऐसी कळवळ्याची जाती'' २०

स्वावलंबन २१

ज्ञानार्जन केलेच पाहिजे २३

असे होते महाराज! २५

असे सांगत महाराज! २६

स्वत: पुरणपोळ्या बनविल्या २९

वक्तशीरपणा व टापटीप ३०

दुसऱ्याच्या वस्तूंची अत्यंत काळजी! ३१

काय आवडतं सद्‌गुरुंना ! ३३


ऐकण्यात सावधानता असावी ३६

मुलांच्या चालीने चालावे। मुलांच्या मनोगते बोलावे । ३८

शिक्षा करण्याची कला ४०

**॥श्रीराम॥**

| | |
|---|---|
| उपदेश न देती । तरी ऐकाव्या त्या गोष्टी । | ४३ |
| नियमाला अपवाद असतो | ४५ |
| शाळेत जायचंच | ४७ |
| क्लास बुडविलात? | ४९ |
| ऐसा पुरुष धारणेचा | ५१ |
| असे होते महाराज! | ५२ |
| असे सांगत महाराज! | ५३ |
| 'सुसंगती सदा घडो' | ५४ |
| यत्न तो देव जाणावा | ५७ |
| असे सांगत महाराज! | ५९ |
| श्रद्धेने धाडस हवेच! | ६१ |
| देवाची पूजा | ६३ |
| यमदूत तिथे कसे येतील! | ६५ |
| परीक्षा | ६७ |
| ''तो परोपकार करीतची गेला'' | ६९ |
| आजोबा किती हुषार? | ७० |
| आत्मा पडद्यासारखा असतो | ७१ |
| असे होते महाराज ! | ७२ |
| असे सांगत महाराज ! | ७३ |



प.पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर

॥श्रीराम॥

# ‘सर्वांसाठी’

ही एक संस्कारकथा! प.पू. श्रीदत्तमहाराजांच्या आठवणी, गोष्टींचे माध्यम स्वीकारुन मांडण्याचा प्रयत्न केला आहे. हे सगळे संदर्भ गोळा होत असतानाच जाणवलं की हे मार्गदर्शन सर्व स्तरातील, वयोगटातील सर्वांनाच उपयुक्त ठरणारं आहे. पण मनात केंद्रबिंदू ‘मुलं’ हाच होता, आहे. हेतू हा की मुलांनी प्रथम गोष्टींच्या माध्यमातून महाराजांना जाणून घ्यावं. संतांच्या विचारातून त्यांचं चरित्र आपोआप प्रगट होत असतं. ते विचार (प्रकाशित झालेली प्रवचनं) वाचण्याची इच्छा व्हावी, त्यांच्या उत्तम गुणांना अंगी बाणवण्याचा प्रयत्न व्हावा.

या सर्व गोष्टींतून महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाची, कार्याची, विचाराची एक दिशा आपल्यासमोर स्पष्ट होत जाते. व्यवहार यशस्वी होण्यासाठी चतुराई व सावधानता असली पाहिजे, जीवनाची सार्थकता उत्तम गुणांवर अवलंबून असते, सर्वांविषयी आपल्या मनात प्रेम असलं पाहिजे, नवीन विचारांचे वाहते वारे परिचित असले पाहिजे, हे सर्व महाराजांनी सांगितलं. अभ्यास, प्रयत्न,कष्ट, निराशेवर मात करणं, देवपूजा, ईश्वरस्मरण, स्तोत्र, यांचं महत्त्व आणि विद्यार्थी–जीवनात त्याची असणारी योग्य आवश्यकता असं विविधांगी मार्गदर्शन केलं आहे.

कर्म, उपासना आणि ज्ञान याची परंपरा कवीश्वर घराण्यातच होती. ईश्वरनिष्ठा आणि तप:पूत जीवन ‘एकजीव’ झालं होतं. त्या परंपरेची ओळख व्हावी म्हणून सुरवातीच्या भागात महाराजांचे आजोबा, आजी, पिताजी व आई यांचा परिचय गोष्टीतूनच दिला आहे व नंतर आप्तस्वकीय साधक भक्तांचे प्रसंग दिले आहेत.

काही ठिकाणी महाराजांचं एकच वाक्य इतकं महत्त्वाचं ठरलं की थोडं लेखनाचं स्वातंत्र्य घेऊन, आजूबाजूचे संदर्भ देत, मुद्दा न सोडता, त्यातील भावार्थ न हरवता मुलांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

ह्यात महाराजांचे आप्तस्वकीय, साधकभक्त यांचे अनुभव सामावले आहेत. पू. महाराजांच्या प्रथम पुण्यस्मरणार्थ प्रसिद्ध झालेल्या ‘धर्मभास्कर’ या मासिकातील काही नोंदी, घटना घेतल्या आहेत. ‘प्रयाग’ हे महाराजांवरील चरित्रही आधाराला घेतले आहे. या सर्वांच्या बहुमोल सहकार्यानेच हे पुस्तक आपणासमोर येत आहे.

प. पू. दत्तमहाराजांच्या जन्मशताब्दीवर्षानिमित्त नम्रतापूर्वक सादर झालेले हे गोष्टींचं पुस्तक म्हणजे प. पू. श्री दत्तमहाराज, प. पू. सौ. आईसाहेब महाराज व प. पू. सौ. ताईमहाराज यांचा आशीर्वादच आहे. म्हणून त्यांच्याच चरणी समर्पित आणि विश्वमांगल्याची प्रार्थना!

*****



प.पू. श्रीदत्तमहाराज, प.पू. सौ. आईसाहेब
मागे प.पू. सौ. ताईमहाराज

## प. पू. दत्तमहाराजांचे आजोबा ''प. पू. श्री वक्रतुंडमहाराज''

ब्रह्मश्री श्रीवक्रतुंडमहाराज हे दत्तमहाराजांचे आजोबा व प.प. टेंबे स्वामीमहाराजांचे समकालीन महापुरुष. वक्रतुंडमहाराजांना वक्तृत्त्वाची अलौकीक ईश्वरदत्त देणगी होती. रामायण, महाभारत, भागवत यांच्या सप्ताहातील त्यांची प्रवचने म्हणजे श्रोत्यांना अपूर्व पर्वणीच असे.

एकदा खर्ड्याला भागवत सप्ताह होता. त्यांचा त्या गावी नेहमीच मुक्काम असायचा. तेव्हा महाराजांचे वडील धुंडीराज शास्त्री महाराज लहान होते. एका झाडाखाली आपल्या सवंगड्यांसोबत खेळत होते. तेवढ्यात एका सावकाराने त्यांना हांक मारली. ''तुझे वडील कुठे आहेत'' म्हणून विचारले. धुंडीराजमहाराजांनी त्यांना वक्रतुंडमहाराजांकडे नेले. भागवतावरील निरुपण नुकतेच आटोपले होते. सावकाराला पाहून ते जागेवरुन उठले. हळूच त्याला बाजूला घेतले. सावकाराने त्यांना करड्या स्वरात सांगितले की मी माझे पैसे घेण्यास आलो आहे. त्या सावकारास त्याच क्षणी पैसे हवे होते.

पू. वक्रतुंडमहाराजांनी त्याला समजावून सांगितले की, उद्या पोथीवर जे पैसे येतील ते सर्व मी तुला देईन. उद्या सप्ताहाची समाप्ती होईतोवर थांब. सावकार कसाबसा तयार झाला. हा प्रकार गावातल्या लोकांच्या लक्षात आलाच होता. महाराजांनी यज्ञ करण्याकरीता कर्ज घेतले होते. गावकऱ्यांचे मत पडले की, महाराजांनी आपल्या सर्वांच्या कल्याणाकरता, देवकार्यासाठी कर्ज काढले आहे. तेव्हा उद्या आपण प्रत्येकाने पोथीवर एक-एक रुपया दक्षिणा ठेवायची असे ठरले. त्या दिवशी दोन हजार रुपये जमले आणि तेवढेच ऋण सावकाराचे होते. महाराजांनी ते सर्व धन सावकाराला देऊ केले.

गावातील लोकांची श्रद्धा व महाराजांचे महत्त्व पाहून त्याला आपल्या

चुकीची जाणीव झाली. एवढ्या मोठ्या महात्म्याकडे आपण कसे पैसे मागितले व कोणत्या शब्दात! त्याच्या डोळ्यातून अश्रू ओघळू लागले, ते धन त्याने नाकारले. महाराजांना नमस्कार केला आणि निघून गेला.

मुलांनो, त्या काळात बैलगाडीतून व पुष्कळदा दाट जंगलातून प्रवास करावा लागे. एकदा झाले असे की महाराज प्रवचनासाठी निघाले होते आणि जंगलात त्यांना मुक्काम करावा लागला. सर्व एका झाडाखाली थांबले. थोड्या अंतरावर एक लमाणांचा तांडा होता. ते जंगली लोक शेकोटीभोवती कसली गाणी म्हणत नाचत ओरडत होते. या मंडळींना पाहिल्यावर चांगली शिकार सापडली म्हणून आनंदाने ते रानटी लोक लाठ्या काठ्या घेऊन, या प्रवाशांना लुटण्यासाठी धावतच आले. पण आश्चर्याची गोष्ट अशी की वक्रतुंडमहाराजांच्या तेजस्वी व दिव्य मूर्तीचे दर्शन झाल्याबरोबर त्यांचा दुष्टपणा नाहीसा झाला. अत्यंत लीनतेने त्यांनी महाराजांना नमस्कार केला. इतकेच नव्हे तर त्या सर्व मंडळींच्या संरक्षणाची हमी घेऊन, विचारपूस करुन त्यांची उत्तम व्यवस्था ठेवली.

स्वजनांविषयी आत्मीयता, त्यागवृत्ती, व्यवहारज्ञान व आपल्यापासून कुणालाही नुकसान पोहचू नये याबद्दल महाराज अतिशय दक्ष असत. श्रीवक्रतुंडमहाराजांची वृत्तीही निर्लोभ व विरक्त होती. **त्यांच्या पूर्वजाला ''तुझ्या कुळात व्युत्पन्न, धर्मशील अशा थोर विभूती जन्मास येतील'' असा श्रीगणेशाचा शुभाशीर्वाद मिळाला होता.**

## ॥श्रीराम॥

## प. पू. दत्तमहाराजांच्या आजी ''प. पू. सौ. सावित्रीबाई''

सौ. सावित्रीबाई ह्या आदर्श पतिव्रता व धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. वाडीला, दत्तप्रभुंना पाचशे प्रदक्षिणा त्या नेमाने घालीत असत. पू. वक्रतुंडमहाराज व सौ. सावित्रीबाई यांची अपत्यं जगत नसत. तेव्हा संन्यास घ्यावा ह्या विचाराने वक्रतुंडमहाराज, गोविंदस्वामींजवळ गेले. तेव्हा स्वामींनी ''तुम्ही चिंता करु नका. हा घ्या दत्तुबाळ!'' असे म्हणून आपल्या जवळील छोटी दत्ताची मूर्ती त्यांना दिली. मुर्तीचा संभाळ स्वत:च्या मुलाप्रमाणे त्यांनी केला. **ही उपासना फळाला आली आणि धुंडीराजशास्त्री महाराजांचा सौ. सावित्रीबाईंच्या पोटी जन्म झाला. ईश्वरभक्तीपरायण असा कुलाची कीर्ती वाढविणारा पुत्र दत्तप्रभुंनी दिला.**

एक दिवस सौ. सावित्रीबाई नित्याप्रमाणे प्रदक्षिणा घालीत होत्या. तेव्हा छोटा धुंडीराज (श्री दत्तमहाराजांचे वडील) कट्ट्यावर खेळत होता. खेळता खेळता तोल जाऊन हा बालक तीन–चार पुरुष खोल अंतरावरुन कृष्णा नदीत पडला. एखाद्या आईने साहजिकच प्रदक्षिणा सोडून रडत–ओरडत मुलाकडे धाव घेतली असती. पण ती वक्रतुंडमहाराजांची पत्नी आणि धुंडीराजांची माता होती! आपले आराध्य दैवत दत्तगुरु आपली सत्त्वपरीक्षाच पाहत आहेत, हे त्यांनी ओळखले. शांतपणे, विचलीत न होता, प्रदक्षिणा सेवा अर्धवट न सोडता पुरी केली आणि नंतरच त्या मुलाकडे धावल्या.

तेवढ्या वेळात सगळीकडे आरडाओरडा झाला. लोक खाली तीराकडे धावले. बघतात तर काय ! एवढा लहान मुलगा इतक्या उंचीवरुन खोल नदीत पडला होता. तो तर आपणहून उसळून येऊन जललहरींवर तरंगत होता. लोकांनी चटकन त्या बालकाला उचलले. ''दत्तप्रभुंची लीला अगम्य आहे ! तुमच्या दत्तात्रेय सेवेचा हा घ्या प्रसाद !'' असे म्हणून लोकांनी धुंडीराजांना सावित्रीबाईच्या ओटीत घातले.

## प. पू. दत्तमहाराजांचे वडील-''प. पू. श्रीधुंडीराजशास्त्रीमहाराज''

महान भगवतभक्त श्री धुंडीराजशास्त्रीमहाराज हे श्रीदत्तमहाराजांचे वडील आणि मंत्रगुरु होते. त्यांचे बालपण वाडीला गेले. शिक्षण श्रीकृष्णशास्त्री वष्ट यांचेकडे इंदूर व नंतर सांगली येथे झाले. महाराजांचा न्यायशास्त्र, वाक्यवृत्ती, पंचदशी, सामान्य निवृत्ती यांचा अभ्यास झालेला होता. अध्ययन पूर्ण झाल्यावर ते वाडीला पुराणसेवा करु लागले. नंतर यांचे सगळे वास्तव्य मराठवाड्यातील 'देऊळगाव राजा' येथेच होते. महाराजांनी अनेक जड-मुढांचा उद्धार केला. विदर्भ-मराठवाड्यात त्यांचा हजारोंनी शिष्य परिवार आहे.

श्री धुंडीराजशास्त्री महाराजांचा स्वभाव व वागणे अतिशय साधे व प्रेमळ होते. स्वत:ची कामे स्वत:च करण्यावर भर होता. दुसऱ्याला आपली सेवा सहसा ते करु देत नसत. रात्री आपल्याजवळ कुणाला 'हवे नको' पाहण्यासाठीही निजू देत नसत. रात्री-अपरात्री त्यांचे नामस्मरण चालूच असे. महाराजांची विद्वत्ता आणि आध्यात्मिक श्रेष्ठता साधेपणाने झाकलेली होती.

एकदा मराठवाड्यातून जालन्यास येताना बसमध्ये त्यांच्या शेजारी एक खेडूत बसलेला होता. महाराजांच्या पायात जोडाही नाही अन् वेषही साधा! तो खेडूत महाराजांना साधा भटजी समजला. त्याने विचारले, ''बिडी पिता कां?'' नाही म्हटल्यावर पुन्हा विचारले, तंबाखू तर चालेल ना'' तोही नको म्हटल्यावर त्यास आश्चर्य वाटले. जालन्याला दोघेही उतरले. धुंडीराजमहाराजांची आलेली भक्तमंडळी त्यांच्या पाया पडू लागली. तेव्हा तो शेतकरी चमकला. तोंडात मारुन घेऊन महाराजांचे पाय धरुन माफी मागितली. महाराज हसून म्हणाले, ''अहो, मी खराच साधा भटभिक्षुक आहे. तुमचं काय चुकलं?''

**॥श्रीराम॥**

श्रीधुंडीराजमहाराज 'आत्मज्ञानी' होते. लोक सतत दर्शनास येत असत. पण त्यांच्या चेहऱ्यावर अढी, त्रास, कंटाळा कधीही दिसला नाही. आपुलकीने, हसतमुखाने सर्वांचं स्वागत करीत.

**स्वत:ला किंवा स्वत:च्या कुळाला उद्धरणं यात विशेष नवल नाही. आश्रयाला आलेल्या भक्तांची कुळे उद्धरणं यात संतांचं संतपण असते, जे प.पू. श्री धुंडीराजमहाराजांमध्ये होते.**

॥श्रीराम॥

## प. पू. दत्तमहाराजांच्या आई ''प. पू. सौ. सरस्वतीबाई''

श्री. सौ. आईसाहेबांचे धार्मिक आचरण व पूजाअर्चा फार कडक व अखंडीत असे. वाडीला प्रदक्षिणा घालण्याचा आपल्या सासुबाईंचा नियम त्यांनीही अखंड सुरु ठेवला होता. सूर्योदयापूर्वी स्नान करुन त्या श्रीदत्ताला पाचशे प्रदक्षिणा घालीत. मुले त्रास देऊ लागली तर त्यांना श्रीदीक्षितस्वामी महाराजांकडे सोपवून आपल्या प्रदक्षिणा पूर्ण करीत. हा विषय सहज निघाला की दत्तमहाराज सद्‌गदीत व कृतज्ञ अंत:करणाने सांगत, ''आमचे जे काही सुदैव असेल ते आईच्या भजनाचे फल आहे. आम्हाला सद्भाव व सत्संगती लाभली ही आईचीच कृपा होय!''

त्या अतिशय साध्या स्वभावाच्या व आतिथ्यशील होत्या. दर्शनासाठी किंवा प्रवासात अनेक भक्त त्यांच्याकडे उतरत असत. वृद्ध झालेल्या असतानाही त्या स्त्रीभक्तांना काम करु देत नसत. स्वत: सगळा स्वयंपाक करुन वाढत व म्हणत, ''तुम्ही माहेरवाशिणी आल्या आहात, तुम्ही कशालाही हात लावायचा नाही'' वयोमानाने त्यांचे सांधे नेहमी दुखत. पण भक्तांच्या अडचणीला त्यांच्या गावी त्या धावून जात असत. प्रसंगी जिना चढून त्या मंडळींची विचारपूस करीत असत.

श्रीधुंडीराज महाराजांप्रमाणे यांच्यावरही ईश्वरी अनुग्रह व अंगी दैवी शक्ती होती. महाराजांच्या सहस्त्रचंद्र दर्शनाच्या महोत्सवात आलेल्या भक्तांना अन्न पुरेल ना अशी शंका व्यवस्थापकांना वाटत होती. ही बोलणी चालली असता आईसाहेब दत्तमहाराजांना म्हणाल्या ''दत्ता ! भंडाऱ्याच्या प्रत्येक पातेल्यात या अक्षता टाक बरं ! कसं पुरत नाही मी पाहतेच !'' त्या दिवशी ३०-३० हजाराच्या पंगतीला अन्न पुरतच गेलं.

**यांचेच पुत्र दत्तमहाराज ! अगदी लहानपणी प. प. श्रीवासुदेवानंद**

**सरस्वती यांनी या बालकाकडे पाहून उद्‌गार काढले, ''आपले उर्वरित कार्य पुरे करण्यासाठी श्री वक्रतुंडशास्त्रीच अवतरले आहेत बरं !''**

मुलांनो, आतापर्यंत पू. दत्तमहाराजांच्या घराण्याची पूर्वपरंपरा बघितली. आता, महाराजांच्या गोष्टींकडे आपण वळूया!

## ।।श्रीराम।।

# असे होते महाराज !

ब्रह्मश्री प. पू. दत्तमहाराज कवीश्वर ! मूर्तीमंत पावित्र्य, शुचिता, साधेपणा! कुठल्याही गोष्टीचे अवडंबर नाही. दिखाऊपणा नाही. कुणाला आपले आजोबा वाटावेत, कुणाला वडीलांसारखे वाटावेत. शांत, संयमित व्यक्तिमत्त्व. देवत्वाचा प्रकाश आजुबाजूला जाणवायचा. त्यांना पाहिल्यावर मनात प्रसन्नता भरुन रहायची !

महाराजांचे बालमित्र सांगत असत, ''महाराज गायनकलेत निष्णात होते. पेटी तबला उत्तम वाजवीत. भजन, पद,भक्तीगीत भावपूर्ण गात. प्रवचन तर करीतच पण कीर्तनही करीत असत. पाण्याच्या कोणत्याही प्रवाहात पोहण्यात ते तरबेज आहेत. सूर्यनमस्कारादि बलोपासना त्यांनी केली आहे. (वयाच्या ६५ वर्षापर्यंत ते सूर्य नमस्कार घालीत असत) सायकलींग चांगले करायचे. ज्ञानसाधनेत ते ज्ञानेश्वरच आहेत आणखी काय सांगावं? स्वभाव कनवाळू, आचरण शास्त्रशुद्ध. संत महात्मेच आहेत ते !''

त्यांचे साधकभक्त सांगतात, ''व्यावहारिक जगात काय चालतं ह्याची पूर्ण माहिती महाराजांना असे. आश्रमाचा निधी वाढविण्याच्या दृष्टीने कुठे पैसे ठेवले की अधिक व्याज मिळेल, हे त्यांना आधीच माहीत असे. त्यांचे वाचन चौफेर होते. रोजचे वर्तमानपत्र आवर्जून वाचत असत. संस्कृत बातम्या ऐकत. जागतिक राजकारणाचीही त्यांना उत्तम जाण होती. एका साधकाजवळ अमेरिकेच्या राजकारणाविषयी त्यांनी मोठे भाष्य केले होते. संतमहात्मे असूनही मुलांच्या कर्तव्याला ते 'पालक' म्हणून कधीही चुकले नाहीत.''

आप्तस्वकीय म्हणतात, ''महाराजांची कधीही आग्रही भूमिका नसे. ते एकदा सांगून बघत. सर्व बाजूंनी ते अलिप्त होते. दैवी संकेतानुसार

चार जीव एका घरात जन्माला येतात. वास्तविक पाहता त्यांचा एकमेकांशी काहीही संबंध नसतो, हा महत्वाचा सिद्धांत ते नेहमी सांगत. घरात अतिथी सारखे रहा, असेही म्हणत. मात्र सर्वांना असेच वाटत असे की माझ्यावर त्यांचे अधिक प्रेम आहे. माझ्याकडे अधिक लक्ष आहे.''

**मुलांनो ! महाराजांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे एक परिपूर्ण व्यक्तिमत्त्व!! असा दुर्मिळ आदर्श स्वत:पुढे नेहमी ठेवावा व स्वत:ला घडविण्याचा प्रयत्न करावा.**

||श्रीराम||


## असे सांगत महाराज !

''विद्याभ्यासनं  व्यसनं वा हरिपादसेवनं व्यसनं'' हे महाराजांचे नेहमी सांगणे असे. एकतर विद्या मिळविण्याचं व्यसन असावं किंवा हरिभक्तीचं व्यसन असावं. यासाठी तीन उदाहरणे महाराज देत.

पहिले प्रल्हादाचे. भक्त प्रल्हाद वयाच्या पाचव्या वर्षीच भजनाला लागले. यास त्यांचे वडील हिरण्यकश्यपू यांचा विरोध होता. एवढ्या लहान वयात भजनाला लागावे हे त्यांना आवडत नसे. पण प्रल्हादांना जणू भक्तीचे बाळकडूच मिळाले होते.

दुसरं महाराज म्हणत की, ज्ञानदेवांनाही लहानपणीच 'सर्वज्ञता' प्राप्त झाली होती. आठ वर्षाची मुक्ताई, चौदाशे वर्षाच्या चांगदेवांना सांगते की, तू अजून कोराच राहिलास. तेव्हा भक्ती आणि ज्ञानाला लहानपण, मोठेपण अशी वयाची मर्यादा नसते.

महाराज अत्यंत प्रेमानं सांगत की, सद्‌गुरुंच्या प्रेमात कधीही भेद नसतो. शिष्याच्या तयारीवर ते अवलंबून असतं. द्रोणाचार्यांचा मुलगा अश्वत्थामा आणि अर्जुन दोघेही द्रोणाचार्यांचे शिष्यच होते. पण अर्जुनाला त्यांनी अधिक विद्या दिली. कारण तो इतका तयारीचा होता की त्याने द्रोणाचार्यांविषयी आतूनच प्रेम मिळविलं होतं. गुरुनांच वाटलं की त्याला अधिक द्यावं. तिथे आवडता-नावडता हा फरक नसतोच.



प.पू. श्रीदत्तमहाराज, प.पू. सौ. ताईमहाराज

||श्रीराम||

## दया तिचे नांव । भूतांचे पालन।


दुसऱ्या महायुद्धाचा काल होता. पुण्यावर जपान बॉम्बवर्षाव करील या भीतीने पुणे शहर रिकामे होऊ लागले होते. पू. महाराजांनीही आपल्या कुटुंबीयांना वाडीस पाठवून दिले होते.

त्यावेळी पुण्यात, वर्तकांच्या वाड्यात एका छोट्या खोलीत महाराजांचे बिऱ्हाड होते. त्यांच्या बरोबर महाराजांचे धाकटे बंधू राहत होते. त्या खोलीत रात्री उंदीर फिरत असत. काही दिवसांनी महाराजांनी कुठले तरी अनुष्ठान सुरु केले. अनुष्ठान सुरु झाल्यापासून उंदरांचा त्रास बंद झाला होता. कदाचित दिव्याच्या उजेडामुळे उंदीर येत नसतील असे वाटले.

एकदा रात्री महाराजांच्या बंधुंना जाग आली. पण ते डोळे किलकिले करुन तसेच पडून होते. महाराजांचे सोवळ्यात अनुष्ठान चालूच होते. मंत्राचे पठन झाले की किती झाले हे कळावे म्हणून महाराज ताटलीत गव्हाचे दाणे टाकीत. त्यांनी अधिक निरखून पाहिले तर त्यांना असे दिसले की कितीतरी उंदीर मंडळी आपल्या परिवारासह ताम्हनापाशी आली होती. महाराज त्यांचा आवडता खाऊ (गूळखोबरे) त्या मंडळींपुढे ठेवीत होते. इकडे सौम्य आवाजात अनुष्ठानाचे मंत्रपठन चालूच असे.

आपला आवडता खाऊ खाऊन व ताम्हनातले पाणी पिऊन उंदीर आपापल्या बिळात गुपचूप निघून जात. अनुष्ठान काळात उंदरांचा खडखडाट जाणवलाच नाही. महाराजांच्या बंधुंनी सापळा किंवा काठी आणायचे सुचविले. तेव्हा महाराज म्हणाले, ''कशाला सापळा पाहिजे? आपल्याला उंदरांचा असा काय त्रास होतो? ते गरीब जीव. कशाला त्यांच्यावर काठी उगारायची?''

**आईचे अंत:करण आपल्या मुलांसाठी जसे कोवळे असते, तशी**



॥श्रीराम॥

कोमल वागणूक, मार्दव महाराजांच्यात होते. त्यांच्या मनात सर्व भूतमात्रांविषयी अतिशय करूणा व प्रेमभाव होता.

**॥श्रीराम॥**

## देव एकच आहे

एकदा एक मुलगा पू. महाराजांच्या दर्शनास आला. तो म्हणाला, ''महाराज, मी तसा रामभक्त आहे. माझी रामावर अनन्य भक्ती आहे. मी रामरक्षा म्हणतो. मला एका सत्पुरुषाने देवीचे स्तोत्र म्हणावयास सांगितले. त्या स्तोत्रात देवी सोडून काही नाही असे लिहीले आहे. त्यामुळे माझा गोंधळ होतो. देवीचे स्तोत्र म्हणताना मी रामाशी प्रतारणा करतो की काय, असे वाटते. तेव्हा मी आता नक्की काय करु?''

महाराज म्हणाले, ''एक न्यायाधीश होते. त्यांनी एक कुत्रा बाळगला होता. सकाळी न्यायाधीश कोर्टात जायला निघाले की सुट, बुट, टोपी असा पोषाख असे. कुत्रा त्यांचे अंग चाटून निरोप देत असे. सायंकाळी न्यायाधीश घरी परत आले की कपडे बदलून बसत. वेषांतर केल्यानंतरही तो कुत्रा हेच आपले मालक आहेत असे ओळखून त्यांचे अंग चाटीत असे. वेष भिन्न असला तरी मालक तोच आहे. हे कुत्र्याला समजले. तेव्हा सगुण साकार स्वरुप भिन्न असले तरी परमेश्वर एकच आहे हे कुत्र्यापेक्षा बुद्धीने श्रेष्ठ असलेल्या माणसाला समजायला हरकत नाही.''

**मुलांनो, श्रीराम, श्रीकृष्ण, श्रीदत्तप्रभू, श्री जगदंबा अशी अनेक रुपे धारण करणारा मूळ देव एकच आहे, शक्तीरुप आहे, हे मनात पक्के धरले पाहिजे.**

**॥श्रीराम॥**

## बहुभाषिक महाराज

महाराजांकडे अनेक परदेशी अभ्यासक ''प्राच्य विद्या'' शिकण्यासाठी यायचे. एकदा एक रशियन विद्वान अध्यात्मावर काही प्रश्न विचारण्यास आले. बरोबर दुभाषा होता. चर्चेला सुरवात झाली. महाराजांच्या प्रगाढ ज्ञानाने तो चकीत झाला. प्रश्नावरील उत्तराच्या विवेचनाने तो अत्यंत भारावला. मनातल्या शंका सगळ्या दूर होत होत्या. समाधान होत होतं.

त्या भावावस्थेत त्याने महाराजांना अतिशय उत्कटतेने एक प्रश्न विचारला. प्रश्न रशियन भाषेत तो विचारत होता आणि त्याचे मराठीत भाषांतर करुन दुभाषा महाराजांना सांगत होता. या प्रश्नाला असे काहीच घडले नाही. रशियन अभ्यासकाने तो प्रश्न रशियन भाषेत विचारला आणि त्याचे मनोवेधक उत्तर महाराजांनी, त्या दुभाषाने भाषांतर करायच्या आधीच तात्काळ अभ्यासकास दिले. तिथे बसलेल्या सर्वांनाच अतिशय आश्चर्य वाटले.

ती मंडळी गेल्यावर एका गृहस्थाने महाराजांना याबद्दल विचारले तर महाराज म्हणाले, ''सर्व भाषा ईश्वराने निर्माण केल्या आहेत. त्याला जाणले की सर्व काही जाणले जाते !''

**मुलांनो, आपल्याला भाषा शिकाव्या लागतात. इतिहास, भूगोलाची पुस्तके वाचून आपल्याला जगाची माहिती होत असते. ज्याला खऱ्या देवाचे स्वरुप अनुभवायला आले आहे, त्या महात्म्याला सर्व काही ज्ञात असते. हे ईश्वराचे सामर्थ्य आहे.**




||श्रीराम||

## "गुणवंताचे गुण घ्यावे"

१९७८ साली वासुदेव निवासात घडलेला हा प्रसंग. महाराज घरी (रेणुका निवास) जेवून साधारण एकच्या सुमारास आश्रमात येत. ते वरच्या खोलीत बसत. एकदा एक साधक दुपारी दोनच्या सुमारास आश्रमात आले. त्यांना महाराजांची पत्रदीक्षा झाली होती. त्यामुळे महाराजांना त्यांनी कधीच बघितले नव्हते. ते सरळ जिना चढून वरती आले. त्यांनी महाराजांनाच विचारले, "दत्तमहाराज कुठे आहेत?" महाराजांनी त्यांना त्यांचेच नांव गांव विचारले. भोजन झाले नसल्यास खाली जाऊन करण्यास सांगितले. ते गृहस्थ खाली आले. तिथे कुणीच नव्हतं. ते पुन्हा वर आले. 'खाली कुणी नाही' म्हणून महाराजांना सांगितलं. महाराज म्हणाले, "चला, मी आलो" महाराज खाली आले. पाट मांडला. तांब्या भांडं ठेवलं आणि स्वत: त्यांना वाढायला सुरवात केली.

महाराजांचे एक विद्यार्थी शिष्य तिथेच तळघरात विश्रांती घेत होते. भांड्यांचा आवाज ऐकून ते वर आले.बघतात तर प्रत्यक्ष महाराज त्या साधकाला वाढत होते. त्यांनी महाराजांना सांगितले, "मी वाढतो, आपण बसा" भोजन करीत असलेले साधक हे सगळं बघत होते. त्यानी विचारले 'हे कोण आहेत' विद्यार्थी म्हणाले, "हे दत्तमहाराज आहेत." ते गृहस्थ अवाक् झाले.

**आपण कुणीच नाही हा महाराजांचा भाव अतिशय पक्का होता. तशीच त्यांची वागणूक होती. गुणवान पुरुष कसा असतो, कसा वागतो ह्याचेच हे उदाहरण नाही का?**



||श्रीराम||

## कर्मनिष्ठा

ठरलेले काम किंवा कर्म त्या त्या वेळेला झालेच पाहिजे, हे महाराजांचे सांगणे असे. कितीही अडचणी आल्या तरी त्यावर मात करुन, शास्त्राने सांगितलेले कर्म आग्रहपूर्वक केले पाहिजे यावर महाराजांचा कटाक्ष होता.

एकदा महाराज लांबच्या प्रवासास रेल्वेगाडीने निघाले होते. प्रात:संध्या घरीच झाली होती. संध्याकाळी गाडी एका मोठ्या जंक्शनवर येऊन थांबली. स्टेशन अतिशय अस्वच्छ होते. नाना प्रकारच्या लोकांनी गजबजलेले होते. लोक मोठमोठ्यांनी बोलत होते. गाडी अर्धा तास थांबणार होती. महाराजांनी दर्भासनाची वळकटी आणि संध्यासाहित्याची पिशवी घेतली. ते त्यांच्या एका शिष्याला म्हणाले, ''आम्ही संध्या आटपून घेतो.'' असे म्हणून स्टेशनवर उतरले. थोड्या अंतरावर एक बेसीन होते. महाराजांनी आसन घातले. कुणाचीही मदत न घेता संध्येकरीता फुलपात्रात पाणी घेऊन आले. आसनावर बसले.

सर्वांना आश्चर्य वाटले की महाराज इथे संध्या करणार? अशा अस्वच्छ व बकाल जागी? न राहवून त्या शिष्याने विचारले, ''आपण इथे संध्या करणार?'' महाराज म्हणाले ,''होय, काय आहे, फार तर लोकं म्हणतील कोणीतरी, इथे काहीतरी करीत बसला आहे. हंसतील तर हसूं देत ! आपला कार्यभाग तर पुरा होईल. नित्यक्रमात खंड पडणार नाही. ईश्वराने संधी दिली आहे तर उरकून घेतो संध्यावंदन !

भस्मधारणादि विधी पूर्ण करुन दहा ते पंधरा मिनिटांत संध्या पूर्ण केली आणि साहित्य गुंडाळून, महाराज गाडीत जागेवर येऊन बसले.

**मंडळी, कुठल्याही स्थळी, कुठल्याही वेळी, कोणत्याही सबबी न शोधता आपली शास्त्रविहित नित्यकर्मे निष्ठेने करीत राहणे, हे महत्त्वाचे आहे.**

॥श्रीराम॥

## ''ऐसी कळवळ्याची जाती ''

श्रीमहाराजांचे आपल्या विद्यार्थ्यांकडे बारीक लक्ष असे. त्यांच्या अडचणी त्यांची सुखदु:ख महाराजांनी आपलीच मानली होती. सर्व ठिकाणी ते समभावाने पाहत असत.

महाराज टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये न्याय-वेदांत शिकवित असत.अतिशय शांत स्वभाव. कनवाळू वृत्ती. विद्यार्थ्यांना ते कधीही 'अरेकारे' म्हणत नसत. एकदा विद्यापीठातील सर्व विद्यार्थी 'गुपचूप गणपतीच्या' (पुणे) देवळात यज्ञासाठी गेले होते. एक विद्यार्थी मात्र विद्यापीठातच होता. इतक्यात विद्यापीठात पोस्टमन आला. त्याने तार आणली. त्या विद्यार्थ्याची आई अत्यवस्थ होती व लगेच निघण्याबद्दल लिहिले होते.

तो विद्यार्थी धावत गणपतीच्या देवळात गेला. गावाला जाण्यास एकही पैसा नव्हता. देवळात तुडुंब गर्दी ! काय करावे सुचत नव्हते. डोळ्यातून अश्रू वाहत होते. थिजून जागच्या जागी उभा होता. पाहतो तर काय ? प्रत्यक्ष गुरुजी (श्रीदत्तमहाराज) समोर उभे ! त्यांनी त्या विद्यार्थ्याच्या हातात शंभराची नोट ठेवली. एका विद्यार्थ्यास गाडीत बसवून देण्यास सांगितले, म्हणाले, ''बरे वाटेल आईला'' त्यांनी महाराजांच्या चरणी मस्तक ठेवले.

त्या विद्यार्थ्याची आई अत्यवस्थ होती. पण, महाराजांनी सांगितलं, आशीर्वाद दिला व त्याच्या आईला खरोखरच बरे वाटले. त्या विद्यार्थ्याने विचार केला, तार आलेली कोणालाही माहीत नव्हती. फक्त त्याला व पोस्टमनला. मग गुरुजींना कळले कसे?

**''सज्जनानां जीवनं परोपकारार्थमेव'' लोकांच्या उद्धाराकरताच अशा सज्जनांचा जन्म होत असतो.**

## ॥श्रीराम॥

## स्वावलंबन

श्री महाराज एका साधकाकडे उतरले होते. त्या घराशी महाराजांचा खूप घरोबा होता. तिथे ते अतिशय मोकळेपणे राहत. महाराजांची सेवा करण्याची संधी मिळणं ही खूपच दुर्लभ गोष्ट असे. प्रत्येकाला वाटत असे की आपण महाराजांचे काहीतरी काम करावे.

तिथे असतानाची गोष्ट ! महाराज स्नान करुन बाहेर आले. स्वत:चे कपडे स्वत: पिळून टाकले होते. घरातल्या भगिनी म्हणाल्या , ''महाराज! कशाला स्वत:चे कपडे स्वत: धुतले? आम्ही धुतले असते. '' या ना त्या निमित्ताने महाराजांची सेवा करावी हा उद्देश. ५३-५४ सालची गोष्ट असावी. तेव्हा डॉ. राजेंद्र प्रसाद हे भारताचे राष्ट्रपती होते. महाराजांनी सांगितले, '' अहो, आपले राष्ट्रपती एवढ्या मोठ्या महत्त्वाच्या पदावर आहेत तरी ते स्वत:चे कपडे स्वत:च धुतात. आपले काम इतर कुणालाही करु देत नाहीत. मग मी केले तर काय एवढे?

त्यानंतर १९८४ साली प. पू. महाराज जालन्याला भागवत सप्ताहासाठी जायला निघाले. सेवा करण्याची संधी मिळेल ह्या इच्छेने, एका साधकाने बरोबर येऊ का म्हणून विचारले. महाराज नको म्हणाले. साधक म्हणाले, ''असू दे ! काही लागलं तर ! '' महाराजांनी शांतपणे सांगितले, ''घरी आमची कामं आम्हीच नाही का करत? यायचं असेल तर तुमच्या हितासाठी या, आम्हाला गरज म्हणून नको. ''

मुलांनो, स्वावलंबन म्हणजे स्वत:चे काम स्वत: करणे. दुसऱ्यांवर अवलंबून राहून कामे खोळंबून ठेवायला महाराजांना आवडत नसे. संध्या करताना पाणी पडत असे ते पुसून घ्यायलाही त्यांचे वस्त्र त्यांच्याजवळ असे. कधी मागावे लागले नाही. ''जीवनाला उपयोगी अशी कुठलीही विद्या शिकता आली पाहिजे. वेळ पडली तर वहाणही शिवता आली

पाहिजे. '' असे महाराजांचे स्पष्ट सांगणे होते.

**आपले प्रत्येक काम आपण स्वत:च करावे आणि कुठल्याही विद्याभ्यासाचा कधीही आळस करु नये हे सूत्र महाराजांनी त्यांच्या वागण्यातून सर्वांसमोर स्पष्ट ठेवले.**

## ॥श्रीराम॥

## ज्ञानार्जन केलेच पाहिजे

एकदा पू. महाराज वाडीला (नरसोबाची वाडी) जायला निघाले होते. सूरज आणि आमोद दोघांनाही वाटले की आपण जावे. प. पू. महाराजांबरोबर जायला मिळणं ही अतिशय आनंदाची, भाग्याची गोष्ट असे. त्यांच्या उपस्थितीत गुरुचरित्राचे पारायण करण्याचा त्यांचा मानस होता. परवानगी मिळाली. दोघांनाही आनंद झाला.

वाडी ! प. प. नृसिंहसरस्वती स्वामीमहाराजांचे पवित्र स्थान ! श्रीपादुकांचे वास्तव्य असलेले, कृष्णातीरी वसलेले रमणीय गांव ! पलीकडच्या तीरावर महाराजांचे मोक्षगुरु प. प. दीक्षितस्वामी महाराजांचे अमरेश्वर . योग चांगला जुळून आला होता.

दोघांचेही पारायण देवाच्या कृपेने पार पडले. ते महाराजांकडे दर्शनाला आले. सूरजने महाराजांना सांगितले की ''परीक्षेला बसायचे आहे. त्याचा अभ्यास सुरु करायचा आहे. आपला आशीर्वाद असावा.'' ही घटना वाडीचीच ! महाराज आश्चर्यचकीत झाले. म्हणाले, ''परीक्षेला बसायचे हे आधी का नाही सांगितलेत? आम्ही इथे येऊ दिले नसते. तयारी करायलाच आधी सांगितले असते. आलात तर आलात ! पण पुस्तकं बरोबर आणली नाहीत. इथे तुम्ही देवाची चोवीस तास सेवा करीत नव्हतात. एखाद्या विरक्ताने असे केले तर हरकत नव्हती. तुम्ही विद्यार्थी आहात. विद्यार्थीदशेत सेवा व अभ्यास दोन्ही साधता आले पाहिजे.''

अशीच एकदा रेणुका निवासात पू. महाराजांकडे काही मंडळी आली होती. सगळीजणं तिथे बसली होती. चर्चा अर्थातच परमार्थाविषयी चालली होती. महाराजांचा नातूही तिथे बसला होता. महाराजांच्या हे लक्षात आल्यावर म्हणाले, ''तुमचे इथे काय काम? तुम्ही अभ्यासाला जा.''

॥श्रीराम॥

विद्यार्थ्याने विद्यार्थीदशेत विद्या संपादन करण्याकडेच प्रयत्नशील असले पाहिजे आणि ज्ञानार्जन सतत करीत राहिले पाहिजे, हेच महाराजांना सांगायचे होते.

||श्रीराम||

## असे होते महाराज !

श्री महाराजांनी आपल्या शरीराची वाजवीपेक्षा जास्त काळजी कधीच घेतली नाही. वर्तक वाड्यातील (शनिवार पेठ) आपल्या घरापासून श्रीवासुदेव निवासापर्यंत भर दुपारी ते अनवाणी येत. अंगावर धोतर आणि उपरणे एवढीच वस्त्र असत. आश्रमात दुपारी विश्रांती घेताना नेहमीचेच उपरणे पांघरुन आपल्या बैठकीच्या लहानशा गादीवर अंग दुमडून झोपत असत.

कुठेही परगावी जायचे असो, त्यांचे सामान अत्यंत आटोपशीर असे. हातात एक लहानशी पिशवी व बोचक्यासारखी लहानशी वळकटी. महाराज अत्यंत व्यवहारदक्ष होते. पत्रव्यवहार करण्याकरता कार्डे, पाकीटे लागत असत. त्याकरता व्यवस्थापकांच्या जवळ पन्नास रुपये देऊन त्यांच्याकडून कार्डे, पाकीटे आणवून घेत. पण आश्रमातील कार्डे, पाकीटे कधीही वापरली नाहीत. भक्त मंडळींना लग्न मुंजीकरीता अहेर पाठविताना देखील कमिशनसकट मनीऑर्डरचे पैसे व्यवस्थापकांच्या जवळ ते देत असत.

महाराजांच्या मनात दुसऱ्यांविषयी जबाबदारीची जाणीव होती. दुसऱ्याचा वेळ आपल्यामुळे वाया जाऊ नये याविषयी ते दक्ष असत. टिळक महाविद्यालयात (पुणे) शिकवित असताना, एखाद् दिवशी त्या विषयाचा त्यांचा तास नसेल तर महाराज प्रत्येक विद्यार्थ्याच्या घरी जाऊन सांगत. (तेव्हा फोनची सोय नव्हती.) कुणी भेटायला येणार असेल तर महाराज अर्धा तास आधी तयार होऊन बसत.

अनेक अडचणींच्या वेळी नेहमी विचार करुन शांतपणाने मार्ग काढीत. कट्टर विरोधकांबद्दल कटू भावना मनात न ठेवता काम कसं करावं याचं मार्गदर्शन सौम्य भाषेत करीत.

**नीतीने कसं वागावं आणि जगावं ह्याचं मार्गदर्शन या छोट्या छोट्या गोष्टीतही किती महत्त्वाचं आहे !**

## असे सांगत महाराज !

### प्रयत्न केलेच पाहिजे

छोटा साधक – ''ईश्वर बुद्धीला प्रेरणा देतो त्याप्रमाणे कर्म घडत असेल तर आपण प्रयत्न करायचे की नाही? कर्म करण्याचं स्वातंत्र्य आपल्याला आहे का नाही?''

महाराज – ''कर्म स्वातंत्र्य म्हणजे काय आहे की प्रयत्न करत राहायचं. शास्त्रात जे करावं असं सांगितलं आहे ते करावं आणि जे करु नये असं सांगितलं आहे ते करु नये.''

साधक – म्हणजे प्रयत्न हे आपल्या हातात असतात. होय ना?

महाराज – आता अभ्यास केला की स्मरण होतं. स्मरणं झालं की लिहीलं जातं आणि लिहीलं म्हणजे पास होतं हे ठरलेलें आहे.

साधक – कळलं नाही महाराज !

महाराज – अभ्यास केला, प्रश्न पाहिला की उत्तराचं स्मरण होतं. स्मरण झालं की लिहीलं जातं. लिहीलं की उत्तीर्ण होतो. हा कार्यकारणभाव आहे. तो बुद्धीवादालाही मान्य आहे. तो खोटा का ठरवायचा?

साधक – हे ठीक आहे. हे पास झालेल्या मुलांचं झालं. पण जो नापास झालेला आहे तो जर म्हणाला, की हे ठरलेलंच होतं. मी नापासच होणार होतो. तर त्याला काय उत्तर द्यायचं?

महाराज – तो असा का विचार करत नाही की जर अभ्यास केला असता तर तोही पास झाला असता. मी नापासच होणार होतो म्हणून गप्प बसण्यात काय अर्थ आहे.

साधक – नाही, काही जण म्हणतात की आम्ही अभ्यास केला होता तरी नापास झालो.


महाराज – मग त्यांनी असा विचार करावा की आमचे काही दोष राहिले असतील. ते पहावे. लिहिण्याचे सुद्धा वर्म ओळखले पाहिजे. ते तेवढं लिहिलं की झालं. चार चार पानं लिहावं नाही लागत.

साधक – म्हणजे प्रयत्न करणं आपल्या हातात आहे हे नक्की !

महाराज – असं आहे, इतके लोक ज्या मार्गाने गेले आणि मोठे झाले तो मार्ग खोटा मानायचा कां? त्यांनी ते अनुभव घेऊन सांगितले आहे. त्यांनी केलं त्याप्रमाणे करायचं म्हणजे आपल्यालाही फळ मिळतं.

साधक – नाही, पण मी जर असं म्हटलं की आता माझा अभ्यास व्हायचा असेल तर होईल. मग?

महाराज – हे बरोबर नाही. व्हायचं असेल तर होईल हा तुझा आळस झाला आणि इतर बाकीच्या रोजच्या गोष्टीत आपण प्रयत्न करतोच की! मग याच गोष्टीत व्हायचा असेल तर होईल असं का म्हणायचं? इतर गोष्टीत प्रयत्न करतोच ना आपण? सकाळी चहा मिळायचा असेल तर मिळेल असे म्हणतो का? स्वयंपाकघरात जातोच ना! मग याच बाबतीत का असा विचार करायचा. प्रयत्न करायलाच पाहिजे.



## ॥श्रीराम॥

## स्वत: पुरणपोळ्या बनविल्या

एकदा महाराजांनी पाठशाळेत शिकणाऱ्या आपल्या विद्यार्थ्यांना घरी जेवायला बोलाविले. पहाटे लवकरच उठून सौ. आईसाहेबांनी बहुतेक स्वयंपाक तयार केला होता. फक्त पुरणपोळ्या गरम हव्या, म्हणून करायच्या ठेवल्या होत्या. नित्यनियमाप्रमाणे आश्रमात प. पू. गुळवणी महाराजांच्या दर्शनाला 'जाऊन येते' म्हणून त्यांनी महाराजांना सांगितले व त्या निघाल्या.

पू. महाराजांनीही आपले आन्हीक लवकरच आटोपले. सर्व विद्यार्थीही वेळेवर आले. सौ. आईसाहेब आता येतील, मग येतील करता करता साडेअकरा वाजले. जेवणाची वेळ तर झालीच होती. तिकडे गुरुमहाराज सौ. आईसाहेबांच्या बरोबर काही विषयांवर बोलत होते, सांगत होते. संभाषण तोडून घरी जायचे तर तो गुरुमहाराजांचा अनमान झाला असता. त्यामुळे सौ. आईसाहेबांना निघता येईना. हे सर्व पू. दत्तमहाराजांच्याही लक्षात आले. ते विद्यार्थ्यांना म्हणाले, ''तुमच्या गप्पा गोष्टी चालू द्यात हे आत्ता आम्ही आलोच.''

महाराजांनी चुलीचा ताबा घेतला. एकामागे एक गोल, व्यवस्थित सारण भरलेल्या पुरणपोळ्या सरसर होऊ लागल्या. पाटपाणी घेतले गेले. विद्यार्थ्यांना जेवायला बसायची विनंतीपूर्ण आज्ञा झाली. पहिलं वाढणं झालं आणि सौ. आईसाहेब आल्या. जेवणाचं काय झालं असेल या चिंतेने त्या खूप घाबरल्या होत्या. परंतु पंगत बसलेली पाहून त्यांना हायसे वाटले. महाराज पूर्ण शांत आणि हसतमुख होते. मग सौ. आईसाहेबांनी स्वयंपाकघराचा ताबा घेतला.

**मुलांनो, आपण करत असलेल्या प्रत्येक कामाला प्रतिष्ठा असते. कुठलेही काम कुशलतेने करता आले पाहिजे. प्रसंग निभावून नेण्याइतके तरी प्रत्येक काम आपण शिकले पाहिजे.**

॥श्रीराम॥

## वक्तशीरपणा व टापटीप

कुठलेही काम नियमित, अत्यंत टापटीपीने करणे, यावर महाराजांचा भर असे. कामाचे वेळापत्रकही त्यांचे आखलेले असे. कामात कुठल्याही प्रकारचा ढिसाळपणा वा चुकारपणा त्यांना चालत नव्हता.

१९८४ साली प. पू. महाराज जालन्यास भागवत सप्ताहास आले होते. तिथे एका गृहस्थांना त्यांनी आपले आंघोळीचे पाणी तापविण्यास सांगितले. सकाळी साडेसहाची वेळ होती. महाराज बसले होते. तेवढ्यात एक साधक गृहस्थ काही लिखाण दाखविण्यासाठी, आपल्या सोईनुसार तिथे आले. ते महाराजांशी बोलत होते. अर्धा तास होऊन गेला. महाराजांनी विचारले, ''आंघोळीचे पाणी तापले कां? '' सेवेकरी म्हणाले, ''अर्ध्या तासापूर्वीच तापले आहे.'' महाराज म्हणाले, ''हे आधीच सांगायचे. हे चालतच राहणार. माणसं येतच राहणार.'' भेटायला आलेले गृहस्थ समोरच बसले होते. महाराज शांतपणे उठून स्नानास गेले. कुठल्या कामाला अग्रक्रम द्यायचा हे महाराजांचे ठरलेले असे. आपण जे ठरविले आहे त्यात ते शक्यतो बदल करीत नसत.

पू. महाराजांचा नीटनेटकेपणा लक्षात येण्यासारखा असे. त्यांची स्वत:ची पिशवी अथवा गाठोडे इतके व्यवस्थित लावलेले असे की काळोखात हात घातला तरी कुठे काय ठेवले आहे ते अचूक शोधून काढता येई. एकदा एका गृहस्थांना त्यांनी एक रुपयाच्या नोटा असलेल्या लिफाफ्याचा 'गाठोड्यातला पत्ता' इतका अचूक सांगितला की त्या ठिकाणी हात घालताच लिफाफा हाती आला.

**मुलांनो, आपल्या वस्तू नेहमीच जागच्या जागी ठेवाव्यात की त्या आपल्याला व इतरांनाही सहजपणे मिळतील. तसेच आयुष्यात अग्रक्रम कशाला द्यायचा याचीही लहानपणापासूनच सवय करावी.**

**॥श्रीराम॥**

## दुसऱ्याच्या वस्तूंची अत्यंत काळजी !

पू. महाराज दुसरीकडे गेल्यावर त्या घराच्या हिताचाच विचार करीत. तिथल्या वस्तूही अतिशय काळजीपूर्वक वापरीत.जगातील सर्व गोष्टी ईश्वराने दिल्या आहेत, त्याचा योग्य तो उपयोग आपल्याला करता आला पाहिजे, ही भूमिका महाराजांची होती.

पू. महाराज जालन्याला एका घरी उतरले होते. अर्थातच महाराजांची खोली स्वतंत्र होती. त्यांच्याबरोबर एक सेवेकरी होते. महाराजांना रात्री दोनदा पाय धुवायला उठावे लागे हे त्यांना माहीत होते. त्यामुळे, महाराजांना काळोखात दिसावे म्हणून बाथरुमचा दिवा रात्री चालू ठेवला व दरवाजा उघडा ठेवला. महाराज रात्री उठले. दिवा चालू आहे हे बघून त्यांनी विचारले, ''हा दिवा कशासाठी?'' सेवेकरी म्हणाले, ''आपणास दिसावे म्हणून'' त्यावर महाराजांनी दिलेले उत्तर मननीय आहे. ते म्हणाले, ''नवीन जागी गेल्यावर दिव्याची बटणं कुठे आहेत हे आम्ही पाहून ठेवतो. त्या अंदाजानी काळोखात जाऊनही दिवा लावता येतो. दिवा लावून ठेवण्याची गरज नाही. उगाच वीज कशाला जाळायची.''

एकदा एका साधकाला महाराजांच्या पायाला तूप लावायची इच्छा झाली. उन्हाळा खूप असल्याने तूप लावल्यास आराम वाटेल असे त्याला वाटले. त्याने आग्रह केला तरी महाराज पुन:पुन्हा नकार देत होते. साधकाने कारण विचारले तेव्हा महाराज म्हणाले, ''आपण दुसरीकडे उतरलो आहोत. तुम्ही तळव्याला तूप लावलंत तर त्यांची ही गादी नाही का खराब व्हायची !''

आणखी एक प्रसंग ! महाराजांचे नेहमी दोनच कपडे असायचे. धोतर आणि उपरणं! सेवेत असलेल्या व्यक्तीला ते कपडे साबणात भिजत घालायचे होते. ते 'महाराजांचे' कपडे म्हणून त्यांनी पाण्यात

दोन चमचे भरुन साबण पावडर टाकली. महाराजांनी ते बघितले व वास्तवाचे भान देत म्हणाले, ''अहो ! दोन कपड्यांना एवढा साबण टाकण्याची गरज नाही.''

**वीज या राष्ट्रीय संपत्तीची उधळण न करता जपून वापरावी. तसेच दुसऱ्यांच्या वस्तू आपल्याच समजून मनापासून काळजी घ्यावी आणि त्या योग्य त्या प्रमाणातच वापराव्यात, हे महाराजांनी आपल्या वर्तणुकीतून दाखवून दिले.**

||श्रीराम||

## काय आवडतं सद्‌गुरुंना !


एकदा असं झालं की सूरज महाराजांकडे रेणुका निवासात सकाळी लवकरच आला होता. त्याने आपले नित्याचे वाचन तिथेच केले. संध्या झाली आणि तो बाहेरच्या खोलीत येऊन बसला. घरात तसे कुणीच नव्हते. मंडळी कामावर गेली होती. त्यामुळे सूरज एकदम आरामात होता. पाय पसरुन एका पायावर दुसरा पाय टाकून मजेत हलवत बसला होता.

आतल्या खोलीत पू. महाराजांची संध्या चालली होती. ती आटोपली. सूरज आपल्याच नादात होता. अचानक खोलीचे दार लावले आहे की नाही बघायला महाराज बाहेर आले. सूरज एकदम गडबडला. तो उठेतोवर महाराज आत वळले आणि सहजपणे म्हणाले, ''बस बस, उठू नकोस. आदर हा मनात असावा. तो बाहेरुन दाखवलाच पाहिजे असं नाही.''

महाराज एकदा स्नानाला जायला निघाले होते. त्यांच्या नातवंडांपैकी कपिलला आधी जायचे होते. त्याने विचारले, ''आजोबा ! मी आधी जाऊ कां?'' महाराज 'हो' म्हणाले व बसले. कपिल पट्कन आंघोळीला गेला. आंघोळ झाल्यावर त्याने बादली स्वच्छ धुतली. बाथरुममध्ये पाणी ओतले आणि आजोबांसाठी आंघोळीचे गरम पाणी लावूनच बाहेर पडला.

आजोबा माझ्यासाठी आंघोळीचे थांबले आहेत हे कपिलने लक्षात ठेवून सर्व व्यवस्था केली हे महाराजांना खूप आवडले आणि महाराजांची त्याला शाबासकी मिळाली. दुसऱ्यांना आनंद देणारं, सुख देणारं बोलणं व तसंच वागणं सद्‌गुरुंना खूप आवडतं, हे नेहमी लक्षात ठेवावं.

**मुलांनो, आदर हा मनात असला की आपोआप आपल्या**



वागण्यातून दिसतो. आदर बाहेरुन दाखवायचा पण मनात नाही, असे होऊ नये. आपल्या मनात इतरांविषयी आदरबुद्धी असावी म्हणजे आचरणही तसेच घडते.

॥श्रीराम॥

## ऐकण्यात सावधानता असावी

पू. महाराज वासुदेव निवासात जायला निघाले होते. सूरज आणि विद्याधर बरोबर होते. थंडीचे दिवस. त्यांना वाटलं शाल बरोबर असलेली बरी. महाराज म्हणाले, ''शाल वगैरे नको. आपण नुसतेच जाऊ.'' गाणगापूर संस्थानच्या प्रसादाची शाल महाराजांना मिळाली होती. ती सतत त्यांच्याजवळ असे. सूरज आणि विद्याधर दोघांनाही वाटलं की येताना वारं सुटलं तर.... म्हणून महाराजांनी नको सांगितलं असतानाही शाल बरोबर घेतली. पण हे महाराजांना माहीत नव्हते.

सर्व रिक्षाने आश्रमात गेले. आश्रमातून निघताना एकदम गडबड झाली आणि शालीकडे दुर्लक्ष झालं. एका गृहस्थांच्या गाडीतून सगळे घरी आले. पू. महाराज नेहमीच्या खोलीत गेले. काठी ठेवली. त्यांनी नजर फिरवली तर पलंगावर शाल दिसेना. महाराजांनी विचारले, ''शाल कुठाय?'' दोघेही चपापले. त्यांच्या लक्षात आले की आपण शाल नेली पण परत आणायला विसरलो. महाराज म्हणाले, ''तुम्हाला सांगितलेले ऐकता येत नाही? सांगितलेले ऐकावे. उगाच जास्त काळजी दाखवू नये. आता कुठे गेली असेल प्रसादाची शाल !''

दोघेही खूप बचैन झाले. घाबरले. परत आश्रमात गेले. शाल शोधली. कुठेही दिसेना. ते दोघेही महाराजांच्या पाठीमागच्या गाडीत होते. त्या गाडीतही शाल नाही. ज्या गृहस्थांच्या गाडीतून महाराज आले, त्या गृहस्थांचा पत्ता फोन नंबर शोधून काढून दोघेही त्यांच्या घरी गेले. ते गृहस्थ बाहेर गेले होते. अर्ध्या तासाने ते आले. दोघांचेही चित्त थाऱ्यावर नव्हते. गाडीत पाहिले तर शाल तिथे होती.

या सगळ्याला दोन-पावणेदोन तास लागले. सूरज विद्याधरला म्हणाला, ''आपण महाराजांचे ऐकले असते तर ही वेळ आली नसती.

त्यांचं एक वाक्य  न ऐकल्याने आपली केवढी पळापळ झाली.''


**संत महात्म्यांनी किंवा घरातील मोठ्या लोकांनी सांगितलेले ऐकल्यास पुढील होणारा गोंधळ टळतो. कारण त्यांचे बोल अनुभवाचे असतात.**

## मुलांच्या चालीने चालावे । मुलांच्या मनोगते बोलावे ॥

श्रीरंग तसा लहानच होता. पण मित्रांमध्ये तो फारसा मिसळत नसे. एकदा त्याच्या आईने वैतागून विचारले, ''अरे, तुला कुणीच मित्र नाहीत कां?'' तो म्हणाला, आहे ना आई ! पण तो माझा 'वयस्कर मित्र' आहे. आई आश्चर्यचकीत झाली. ती म्हणाली 'कोण?' तो उत्तरला ''दत्तमहाराज''

हाच श्रीरंग वाडीला गेला होता. बरोबर आई–बाबा होतेच. वाडीला शृंगेरी पीठाचे शंकराचार्य महाराज आलेले होते. त्यांचे प्रवचन सुरु होते. हा सरळ कट्ट्यावर बसलेल्या महाराजांजवळ जाऊन बसला. महाराज बाजूला सरकले व त्यास शेजारी बसवून घेतले. त्याच्या मनात महाराजांविषयी मित्रत्वाची भावना होती. दोघेही बोलत होते. शौनक म्हणाला, ''मला अभ्यास करायचा खूप कंटाळा येतो.'' महाराज म्हणाले, ''हळू हळू थोडाथोडा करायचा. मग अभ्यासाची सवय लागते'' शौनकला महाराजांचा खूप लळा होता. इतका की औरवाडहून नागपूरला जायला निघाला तेव्हा महाराज ज्या खाजगी बसमध्ये बसले होते; त्या गाडीला प्रदक्षिणा घालायला सुरवात केली. जरा वेळानं गाडीत शिरून महाराजांना म्हणाला,''आपली आठवण आली तर काय करु?'' महाराज म्हणाले ''दिगंबराचा जप करा''

एकदा दिवाळीच्या सुटीत श्रीरंग कोणाच्या तरी बरोबर एकटाच वाडीला आला, तेव्हा तो सातवीत होता. महाराज तिथे आलेले होते. त्याने महाराजांना नमस्कार केला. महाराज म्हणाले, ''एकटेच आलात?'' ''हो महाराज,'' शौनक म्हणाला. महाराज त्याच्याशी बोलत होते. बोलता बोलता म्हणाले, 'एकटे कसे आलात? तिकडे आईबाबांबरोबर दिवाळी करायची, फटाके वाजवायचे, मित्रांमध्ये



प.पू. श्रीदत्तमहाराज व उगारचे यतिमहाराज

||श्रीराम||

## शिक्षा करण्याची कला


१९९७सालची गोष्ट. पू. महाराजांची तब्येत बरी नव्हती. पण त्यानी आश्रमात (श्री वासुदेव निवासात) जायला सुरवात केली होती. एका सकाळी घरी फोन आला. फोनवरील गृहस्थांनी सांगितले की उगारचे स्वामी महाराज पुण्यात आले आहेत व त्यांना महाराजांना भेटायचे आहे. सूरजने त्यांना सांगितले, ''महाराजांची तब्येत बरी नाही. त्यामुळे ते कोणाला भेटत नाहीत व येऊही शकणार नाहीत. वासुदेवनिवासात ते चार वाजता जातात. त्यांना आश्रमात येऊन भेटू देत.'' ते गृहस्थ म्हणाले, ''स्वामींना फक्त महाराजांना भेटायचे आहे. त्यांना घरी येऊ दे कां?'' सूरजने 'साडेतीन ते चारच्या दरम्यान येऊन भेटावे' असे सांगितले व फोन ठेऊन दिला

सूरजला वाटले की आपण योग्य तेच सांगितले. महाराजांची तब्येत ठीक नसताना ते कुणालाही कसे भेटतील? आत येऊन त्याने महाराजाना फोन आल्याचे सांगितले. महाराज म्हणाले '' तुम्ही काय सांगितलं त्यांना ?''

''घरी येऊन भेटू दे'' सूरज म्हणाला.

महाराज एकदम रागावले, म्हणाले ''अहो संन्यासी महाराज घरी कसे येतील? त्यांच्या दर्शनाला आपण जायचं का त्यांनाच आपण बोलवायचं? त्यांची योग्यता फार मोठी आहे. आम्हाला विचारायचे तरी! एकतर आम्हास न विचारता परस्पर सांगितलेत. कुठल्या गृहस्थांचा फोन होता तेही विचारले नाहीत. आता कुठे शोधायचे त्यांना?''

वातावरण फारच तापले होते. तेवढ्यात महाराजांचे मधले चिरंजीव तिथे आले. त्यांनी सांगितले, उगारचे स्वामी महाराज नेहमी पुण्याला आनंदाश्रमात उतरतात. मी चौकशी करतो व सांगतो. त्यांनी आनंदाश्रमात




महाराज आपल्यासाठी बाहेर आले, हे महाराजांना आवडलं नाही. म्हणून त्यांना सूरजचा रागही आला होता आणि आशीर्वादाच्या आधी औषध लावायची वेळ आली याचाही संकोच महाराजांना वाटत होता. या सगळ्या भावनांचं एक संमीश्रण महाराजांच्या आचरणातून प्रकट झालं होतं.


**मुलांनो, हे सगळं सूरज व अश्विन दोघांच्याही लक्षात आलं. पू. महाराजांची सहनशक्ती, स्वामी महाराजांविषयी अत्यंत आदरभाव आणि आशीर्वादाचे महत्त्व ह्या तीनही गोष्टी महाराजांनी शब्दही न बोलता, केवळ आपल्या आचरणातून शिकवल्या. प. प. टेंबेस्वामी महाराज म्हणतात,**

**सदा संतापाशी जावे । त्यांचे जवळी बैसावे ।**
**उपदेश ते न देती । तरी ऐकाव्या त्या गोष्टी ।**
**तेचि उपदेश होती । त्याही कष्ट नष्ट होती ।**
**वासुदेव म्हणे संत । संगे करीती पसंत।**

सूरज म्हणाला ''जेवतो, महाराज !'' महाराज प्रसन्नपणे हंसले.

**काही नियमांना अपवाद असतो. त्यासाठी शास्त्रशुद्ध मार्ग सांगितलेले असतात. त्यानुसार वागावे. त्यामुळे आपोआप आपले शहाणपण, आपली समजूत व्यापक होत जाते. अंत:करण दुखावले जात नाही.**





**॥श्रीराम॥**

## ऐसा पुरुष धारणेचा !

एक शिकाऊ कीर्तनकार होते. नवीनच होते. कीर्तन चांगलं करीत असत. एकदा एका मोठ्या उत्सवात त्यांचं कीर्तन होतं. महाराज त्या उत्सवास हजर होते. त्या दिवशी कीर्तन व्यवस्थित पार पडलं. पू. महाराज आपल्या जागेवरुन उठले आणि कीर्तनकारांचे पाय धरले. ते गृहस्थ एकदम गडबडून गेले. श्रीदत्तमहाराजांसारखे सत्पुरुष, महापंडित पाय धरतात..... ते अतिशय संकोचले. महाराजांना सद्‌गदित अंत:करणाने म्हणाले, ''महाराज, हे आपण काय करता आहात? आपलं दर्शन हेच आमचं भाग्य. आशीर्वाद देण्याचा आपला अधिकार ! आम्ही आपले पाय धरायचे !!

महाराज म्हणाले, ''अहो, ही नारदांची गादी. ह्या गादीवर येणारा कुणीही माणूस हा 'नारद' आहे. तुमचे पाय धरणे म्हणजे नारदांचे पाय धरणे.''

**झाडाला खूप फळे आली की त्या भाराने झाड झुकते. नम्र होते. मुलांनो, महाराज तसेच होते. जो खरा मोठा असतो तो स्वभावत: विनयशील असतो. त्यांना जिथे जिथे दिव्यत्व जाणवतं (मग ते प्रतिकात्मक असलं तरीही) तिथे तिथे ते सहजपणे लवतात, ह्याचेच हे उदाहरण आहे.**

||श्रीराम||

## असे होते महाराज !

१९८० साल ! श्रीमहाराजांच्या अमृतमहोत्सवाचा दुसरा दिवस. महाप्रसादाकरता वासुदेवनिवासात बरीच गर्दी झाली होती. लोक जेवायची पानं धरण्यासाठी गडबड करीत होते. एका पंक्तीत दोन–चार पानं शिल्लक होती. त्यातील एका पानावर श्रीमहाराज येऊन बसले देखील ! एका सामान्य भक्ताप्रमाणे ! कुणी मानाने बोलावतील, आपले निराळे वैशिष्ट्यपूर्ण स्थान असेल, मग आपण जाऊ....... हा विचारच मनात नाही. जे काही घडतं ते ईश्वराच्या इच्छेने घडतं, हा भाव अतिशय पक्का होता.

सांगता समारंभामध्ये मोठे हार घालून ज्यांचा सत्कार केला, ज्यांना लाखाचा निधी दिला, ज्यांचा गुणगौरव केला अशी महान व्यक्ती आपल्या पंक्तीत बसली आहे हे कित्येकांना कळले देखील नाही. त्यामुळे महाराजांचे भोजन होण्याआधी काही मंडळी हात धुण्यासाठी उठली देखील !

महाराजांचे श्रीमद्‌भागवतावर अलोट प्रेम होते. एका वर्षी श्रीवासुदेव निवासात श्रीमद्‌भागवतावर विवेचन करताना ताप आलेला असूनही त्यांनी विवेचन चालूच ठेवले. आरतीच्या वेळी महाराजांना खूप थंडी भरुन आली. उभे देखील राहता येईना. पण आरती होईतोवर महाराज मोठ्या नेटाने तसेच उभे राहिले. वेळ पडली तर जेवणाच्या पत्रावळीही महाराज स्वत: उचलीत असत.

**मुलांनो, महाराज कमालीचे साधे होते. लीनता, अमानित्व आणि प्रसिद्धीपासून सदैव दूर राहणे हा त्यांचा स्व–भाव होता, म्हणून त्यात सहजता होती.**

## असे सांगत महाराज !

### ईश्वरस्मरण करायचं !

छोटा साधक – ''महाराज, कधी कधी खूप चुका होतात.''

महाराज – ''चालायचंच ! चुका होतातच. आमच्या हातूनही पुष्कळ चुका होतात की. परंतु ईश्वरस्मरण करायचं. केलेल्या चुकीबद्दल पश्चात्ताप होऊन अश्रू वाहून गेले की संपलं सगळं! अपराध गेले की काही राहिलं नाही, बरं का?'' ते स्तोत्र तुम्हाला माहीत आहे नां....''रसज्ञा वशा तारकं स्वादुलभ्यंम्'' ते शांतपणे एका कोपऱ्यात बसून म्हणावं. डोळ्यातून अश्रू गेले की झालं. आम्ही केलेली चूक केलीच नाही, आम्ही चुकतच नाही म्हटल्यावर काय आहे? चालायचंच. देवाची प्रार्थना करायची.

||श्रीराम||

## ‘सुसंगती सदा घडो’

प. पू. महाराजांच्या नेहमी सांगण्यात यायचे की सत्पुरुषांची जेवढी चरित्रे वाचावयास मिळतील तेवढी वाचीत जावी. पुस्तकाचे वाचन करताना आपण त्या सत्पुरुषांच्या संगतीत जातो. सत्संग घडतो. संत वागतात कसे, राहतात कसे, त्यांना काय सांगायचे असते, साधनामार्ग त्यांनी कसा आचरला, त्यांचे काही अनुभव, दैवी गुणसंपदा या सर्व गोष्टींचे शुद्ध, सात्त्विक संस्कार अशा ग्रंथांच्या वाचनाने आपल्या मनावर होतात. ते संस्कार व्यावहारिक, आध्यात्मिक साधनेत अतिशय उपयुक्त ठरतात.


वेदाध्ययन करायला निघालेल्या एका विद्यार्थ्याला महाराज म्हणाले, ''आपण वेदाध्ययन करण्यास जात आहात. शक्यतो चांगली संगती धरावी. चांगल्या संगतीतच राहावे. पानात पडेल ते खावे. शिळं असो, ताजं असो,...'' नंतर महाराजांनी एक श्लोक त्यांना सांगितला,

'' अलसस्य कुतो विद्या? अविद्यस्य कुतो धनम्?
अधनस्य कुतो मित्रम्? अमित्रस्य कुत: सुखम्? ''

आळसाची संगती धरलीत तर विद्या संपादन करता येणार नाही. विद्या ही लौकीक यशासाठी आणि आत्मविद्या ही पारमार्थिक यशासाठी असते. विद्या नसेल तर धन जमा होणार नाही. हे धन दोन प्रकारचे असते. एक व्यावहारिक पैसा, जो चांगल्या मार्गाने मिळविलेला आहे. दुसरे धन म्हणजे दैवी गुणसंपदा ! दैवी गुणांमुळे सज्जनांचा सहवास घडतो. दैवी गुणसंपदेचे धन नसेल तर सज्जनमैत्री घडणार नाही आणि आत्मिक समाधान देणाऱ्या सज्जनांचा मेळावा नसेल तर आत्मिक प्रगती होणार नाही. त्यामुळे आळस हा मोठा शत्रू आहे. त्याची संगती सोडावी, हा महाराजांच्या सांगण्याचा यथार्थ आहे.

॥श्रीराम॥

आळस हा व्यावहारिक व पारमार्थिक प्रगतीचा मोठा शत्रू आहे.



॥श्रीराम॥

## यत्न तो देव जाणावा

संदीपने मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा डिप्लोमा पूर्ण केला होता. एका नवीन टेक्नॉलॉजीवर त्याचे व त्याच्या मित्रांचे संशोधन चालले होते. शोध कार्याचे स्वरुप अतिशय महत्त्वाचे व खर्चिक होते. लोखंड कटींगचे मशीन तयार करण्याचा त्याचा विचार होता. यश आले तर भारतातील ते पहिलेच मशीन ठरणार होते.

हे फार मोठे धाडस होते. संदीपचे वडील म्हणाले, ''तू एवढे मोठे धाडस करीत आहेस. तुझ्या प्रयत्नांना यश मिळावे म्हणून आपल्या सद्गुरुंना हे सगळं सांग व त्यांचे आशीर्वाद घे'' संदीपने लगेच होकार दिला. वडीलांच्या सोबत तो पुण्याला महाराजांकडे आला. महाराजांनी अतिशय आत्मीयतेने सगळं ऐकलं. संदीप म्हणाला, ''महाराज ! चालले आहे ते बरोबर आहे ना? आम्ही पुढे जाऊ ना ? यश मिळेल ना?

पू. महाराज मनापासून हसले. म्हणाले, ''ठीक आहे ! चांगलं चाललं आहे, यासाठी प्रयत्नांची शिकस्त करायला हवी. चिकाटी हवी. तुम्हाला त्या विमानाचा शोध लावणाऱ्या राईट बंधुंची गोष्ट माहीत आहे का? ते आकाशात भरारी मारणाऱ्या यानाचा शोध लावीत होते. आर्थिक बळ लागणारच होते. त्यांनी बचत करुन खूप पैसे जमवले. विमान बांधणी आणि संशोधनाला सुरवात झाली. ह्या गोष्टी पूर्ण होण्यास जेवढा अवधी लागतो तेवढी तितिक्षा म्हणजे धीर धरण्याची तयारी हवी. रात्रंदिवस प्रयत्न करुन त्यांचे विमान तयार झाले. पण आकाशात काही अंतरावर भरारी मारताच ते खाली कोसळले. सारी मेहनत, सारा पैसा मातीमोल झाला पण ते काही खचले नाहीत. पुन्हा प्रयत्न करायचे तर आर्थिक सहाय्य हवे. त्यांनी सायकल दुरुस्तीचे दुकान काढले हिंमत हरले नाहीत. पैसा जमा झाला. पुन्हा नेटाने प्रयत्नास लागले.''

महाराज संदीपला पुन्हा म्हणाले, ''चिकाटीने प्रयत्न केले तर यश मिळणारच. काम धैर्याने पुढे न्या आणि यशस्वी व्हा.'' संदीपने अनेक अडचणींवर मात करुन अथक प्रयत्नाने मशीन पूर्णत्वास आणले. हे सर्व सद्गुरुंचे कृपापूर्ण मार्गदर्शन व आशीर्वाद

**कष्टेवीण फळ नाही । कष्टेवीण राज्य नाही ।**
**केल्यावीण होत नाही । साध्य जगी ।।**

॥श्रीराम॥

## असे सांगत महाराज !

### निराश व्हायचं नाही

छोटा साधक – ''महाराज, मनात वाईट विचार येतात.''


महाराज – ''जे होतंय ते सर्व देवाच्या प्रेरणेनं होत आहे, अशी भावना ठेवायची, ही सगळी त्याची लीला आहे. चांगलं वाईट जे घडेल ती त्याची लीला आहे. तो हितैषी आहे. जे घडतंय ते चांगल्यासाठीच आहे हे पक्कं लक्षात ठेवायचं.


साधक – ''त्या विचारांमुळे अभ्यासात लक्ष लागत नाही. होत नाही.''

महाराज– ''होत नाही म्हणजे काय? करायचा. निराश व्हायचं काय कारण आहे. निराश व्हायचं नाही. मारुतीराय कधीही निराश झाले नाहीत. त्यांच्याजवळ निराशा नव्हतीच. अनिर्वेद आहे. निर्वेद म्हणजे निराशा आणि अनिर्वेद म्हणजे आशा.

शंकरांना म्हणे वाटलं की रामांची सेवा करावी पण कोणतं रुप घ्यावं? विचार करता करता हे वानराचं रुप बरं आहे म्हणाले. स्वामीकडे काही मागायला नको. झाडावरची फळं खावीत. पाणी प्यावं आणि भरपूर सेवा करावी. त्यांनी कधीही रामाजवळ काही मागितलं नाही. नाहीतर त्यांचा अधिकार काय होता.मागतील ते दिलं असतं पण नाही. फक्त सेवा, निष्काम भावाने सेवा करायची आहे. त्या जोरावर लंकेत गेले. सीताशोध केला. निराशा नाही. रामायणात वाल्मिकींनी लिहून ठेवलंय.''

।।श्रीराम।।





असते, उन्हात नको, जेवल्याजेवल्या नको किंवा पुण्यात चांगल्या तलावात पोहावे इथे नको, अशी विनाकारण चिंता महाराजांनी केली नाही. मुलांनी ज्या वयात जे शिकायला हवे, ते धाडस करुन शिकलेच पाहिजे, हे महाराजांचे म्हणणे होते. सूरज उत्तम पोहायला लागला, हे सांगायला नको.

**ईश्वरावर पूर्ण निष्ठा ठेऊन, कुठलीही नवीन कला शिकायला घाबरु नये, हेच खरे!**

**मनी धरावे ते होते । विघ्न अवघेचि नासोन जाते ।**
**कृपा केलीया रघुनाथे । प्रचीत येते ।।**

॥श्रीराम॥

## देवाची पूजा

देवाची पूजा ही अतिशय मनापासून आणि लक्षपूर्वक झाली पाहिजे. यावर महाराजांचा कटाक्ष असे. महाराजांच्या पुजेची विशिष्ट पद्धत होती. त्यात 'देवाच्या तीर्थाचं' महत्त्व होतं.

आठवी-नववीत असलेल्या महाराजांच्या नातवाने, आमोद याने एकदा देवाची पूजा केली. पूजा झाल्यावर तीर्थाची विभागणी असे. घरातील लोकांना देण्यात येणारं तीर्थ गडूत काढलं जायचं तर बादलीत ठेवलेलं तीर्थ औदुंबराला घातलं जायचं. त्या दिवशी पूजा करताना आमोदचं मन थाऱ्यावर नव्हतं.; घाईघाईत पूजा चालली होती. पूजा झाली अन् सर्व तीर्थ बादलीत ओतलं. ते औदुंबराला घातलं. पूजा आटोपली.

तेवढ्यात महाराज देवाच्या तिथे येऊन बसले. ''तीर्थ'' असे म्हणून हात पुढे केला. आमोद एकदम गडबडला. तीर्थ काढायचं विसरलो. आता काय? महाराजही रागावले, म्हणाले, ''देवाचं तीर्थ काढलं नाहीत? तीर्थ हे 'सर्वरोगपरिहारक' आहे. लक्ष कुठं असतं तुमचं ? देवातल्या पादुका काढा आता. त्यावर पुन्हा अभिषेक करा व तीर्थ सगळ्यांना द्या.''

महाराजांनी सांगितलं त्याप्रमाणे त्याने केलं. तीर्थ दिलं. महाराज प्रेमानं आमोदला म्हणाले, **'' आपण कुठली गोष्ट मनापासून, लक्षपूर्वक केली की त्यात चूक होत नाही. त्याचं उत्तम फळ मिळतं.''**



## यमदूत तिथे कसे येतील!!

सूरज पू. महाराजांबरोबर नारेश्वरला (प.पू. रंगावधूतस्वामीमहाराजांचे गुजराथमधील पवित्र स्थान) गेला होता. महाराजांचा तिथे सात दिवस भागवत सप्ताह होता. सकाळी संहिता वाचन चालायचे. संध्याकाळी चार ते सात पर्यंत निरुपण असायचे ८८ सालची ही गोष्ट.

त्यावेळी बरीच मुलं होती तिथं. सगळी तरुण वयातील. समवयस्क. तेव्हा नारेश्वरला फार गर्दीही नसायची. नर्मदामाईचं विस्तीर्ण पात्र मुलांना खुणवीत होतंच. सकाळी गुरुचरित्राचं पारायण करायचं. संध्याकाळी थोडंसं निरुपण ऐकलं की ही सगळी मुलं थेट नर्मदेत डुंबायला खरे तर पोहायलाच जात असत. येताना संध्याकाळ व्हायची. आंघोळ झाल्यावर स्तोत्र म्हणत म्हणत परत यायचं. मजेत चाललं होतं सगळं

एक दिवस तिथल्या संस्थेच्या सदस्यांनी सांगितलं की, ''संध्याकाळी अंधार पडण्यापूर्वी परत यावे. पाण्यात मगरी आहेत.'' मुलांनी लक्ष दिलं नाही. तेव्हा सदस्यांनी थेट महाराजांना जाऊन सांगितलं. दुसऱ्या दिवशी सगळी मुलं महाराजांच्या दर्शनाला गेली. महाराज म्हणाले,...

''अरे ! तुम्ही संध्याकाळी पोहायला जाता कां?''

''होय, महाराज ''

''अंधार होतो. उशीर करत जाऊ नका. पाण्यात मगरी वगैरे असतात.''

मुलं एकमेकांकडे बघत गप्प होती. सूरजला काही स्वस्थ बसवेना. त्याने आजोबांना विचारले....

''पण आजोबा ! भागवत पुराणातील गोकर्ण महात्म्यात असे सांगितले आहे ना की जिथे भागवत सप्ताह सात दिवस चालू आहे, तिथे यमाचे दूत येत नाहीत?''

महाराज म्हणाले ''हो ! पण अहो, त्या मगरीने पकडून या काठावरुन पलीकडच्या काठावर नेले तर स्थान बदलेल की ! भागवत सप्ताह या

काठावर सुरु आहे त्या नाही.

पू. महाराजांचे सांगणे अतिशय पारदर्शक आणि तर्कसंगत होते. विचारांचा गोंधळ नव्हता आणि मी सांगतो म्हणून ऐका हा आग्रहही नव्हता.

**मुलांनो, श्रेष्ठ धर्मग्रंथातील विचारांचा चुकीचा अर्थ काढून, अयोग्य आधार घेऊन आपल्या वागण्याचे समर्थन करु नये.**

॥श्रीराम॥

## परीक्षा

आमोद दहावीत होता. एकदा महाराज त्याला सहज म्हणाले, ''आपलं बँकेत खातं आहे कां? '' आमोद म्हणाला ''नाही.'' ''असावं! पैसे साठवून ठेवावे. अडीअडचणीला उपयोग होतो.''

आमोदने शंभर रुपये भरुन खातं उघडलं. महाराजांना पासबुक दाखवलं. महाराज पुन्हा म्हणाले, ''आपले खाऊचे पैसे त्यात जमा करावे. आपल्यालाच उपयोग होतो. आईचे नांव घातले कां त्यात?'' ''नाही'' महाराज म्हणाले,''टाका त्यात. तुम्ही नसलात तर पैसे त्या टाकतील आणि लागले तर काढुही शकतील'' आमोदने आईचं नांव खात्यात टाकलं.

एक दिवस महाराज आश्रमातून आले व त्याला आपल्या जवळील शंभर रुपये दिले. बँकेत ठेवा म्हणाले. आमोद म्हणाला, ''हे कशाकरता आजोबा?'' ''आमचे आहेत. आम्हाला वाटलं तर घेऊ तुमच्याकडून. आत्ता बँकेत भरा तुम्ही. '' या गोष्टीला दीड–दोन महिने झाले. महाराजांना एका साधकाच्या मुलीच्या लग्नाचे आमंत्रण आले. घरी जेवण झाल्यावर म्हणाले, ''त्यांच्या मुलीचे लग्न आहे. फुल ना फुलाची पाकळी द्यावी लागेल.''

आमोदच्या लक्षात आले. त्याने शंभर रुपयाच्या चेकवर सही केली व महाराजांना दिला. दोन–चार दिवसांनी आमोदचे काका घरी आले तेव्हा महाराज त्यांना म्हणाले, ''आमोद आता मोठा झाला आहे. आम्ही परीक्षा पाहिली त्याची. त्याला पैशाचा मोह नाही. त्यामुळे त्याच्याकडे घरखर्चाचे पैसे द्यायला हरकत नाही.''

**महाराज नेहमीच समोरील व्यक्तीला व्यवहारदृष्टीने पारखून घेत. बचतीचं महत्त्व सांगत. ज्याचं आहे ते त्यांना परत द्यायचं, ही बुद्धी**

होणं महत्त्वाचं असतं. ही बुद्धीचीही परीक्षा महाराज घेत व तशी बुद्धी तयार करीत, हे वरील गोष्टीवरुन किती सहजपणे कळतं नाही कां?

||श्रीराम||

## 'तो परोपकार करीतची गेला'

**जीवनात सुखदु:खाचे, मानापमानाचे प्रसंग सर्वांवर येतात. श्री महाराजांवरही आले होते. पण त्यांनी आपले धैर्य त्या प्रसंगात कायम राखले. मान अपमान ह्या दोन्ही गोष्टींकडे समभावाने पाहिले. अन्यायाला क्षमा केली.**

टिळक विद्यापीठात असताना असाच एक प्रसंग घडला. महाराज न्याय व मीमांसाशास्त्र हे विषय विद्यापीठात शिकवत. तेव्हा एकशेसाठ रुपये पगार(फक्त !) मिळत असे. एकदा देऊळगाव राजाला गेल्यावर महाराजांना ताप येऊ लागला. विद्यापीठात जाणार कसे? म्हणून दोन-तीन दिवसाची रजा मागितली. तो ताप विषमज्वराचा निघाला. महाराजांनी वैद्यकीय दाखला पाठवून अधिक रजा मागितली. ती रजा बिनपगारी झाली. वैद्यकीय रजा असूनही मंजूर केली गेली नाही. त्यामुळे पगारही दिला नाही.

महाराज कुणालाही बोलले नाहीत. दोष दिला नाही. ही गोष्ट विद्यार्थ्यांना समजल्यावर त्यांनी पाचशे रुपये जमविले. विद्यार्थ्यांचा विरस होऊ नये म्हणून त्यातील फक्त २५० रुपये घेतले. आणि ''त्याहून अधिक घेण्याचा मला अधिकार नाही.ते पैसे ठेवून द्या. त्यातून एक शिक्षकनिधी तयार करा. गरजू शिक्षकाला जसे लागतील तेव्हा त्याच्या अडचणीसाठी पैसे देता येतील अशी व्यवस्था करा.'' असे सांगितले.

प्रसंग आला असता शांत राहून त्रास सहन केला. प्रशासकीय कार्यपद्धती उपयोगात आणताना कुणावरही अन्याय होऊ नये, असा इतरांच्या हिताचा विचार त्या परिस्थितीतही महाराजांनी केला. शांतवृत्ती न सोडता, विद्यापीठावर राग न धरता 'शिक्षकनिधीची' योजना केली. ही मनाची आत्यंतिक शुद्धता म्हणजे जणू ईश्वराचेच मन!

॥श्रीराम॥

## आजोबा किती हुषार?

ज्ञान आणि नम्रता एकाच जागी नांदणाऱ्या महापुरुषांची उदाहरणे विरळाच! थोडे जरी ज्ञान मिळाले तरी अहंकाराने फुगून जाण्याची जगाची रीत आहे. **पण खऱ्या ज्ञानाचे महत्त्व ज्यांना कळते, ज्ञानाची खोली आणि विस्तार, ज्यांच्या लक्षात येतो ते महापुरुष स्वत:च्या ज्ञानाविषयी कधीच बोलत नाही. महाराज तर 'ज्ञानाचा अगाध साठा' होते.**

कपिलला एक प्रश्न पडला होता. महाराजांचे मोठेपण तो बघत होता. सत्कार सन्मान कानावर येत होते. अनेक विद्वान, यतीसंन्यासी महाराजांना भेटून जात तेव्हा होत असलेल्या चर्चा, संभाषण कानावर पडत होते. आपले आजोबा किती हुषार आहेत, असा प्रश्न त्याला पडला होता. त्याने बालसुलभ भावाने महाराजांना विचारले,.....

''आजोबा ! सगळे म्हणतात तुम्ही फार विद्वान आहात. प्रकांड पंडित आहात. म्हणजे तुमचे ज्ञान तरी किती आहे हो?''

महाराज एकदम हंसले. म्हणाले,.....''समुद्रात अथांग पाणी असतं. त्या पाण्यात तांब्या बुडवून बाहेर काढल्यावर, त्या तांब्याच्या बुडाला बाहेरुन जे थेंबभर पाणी चिकटतं तेवढे ज्ञान आमचे आहे.''

हे उत्तर ऐकून कपिल हिरमुसला. विचारात पडला. ते महाराजांच्या लक्षात आले. त्याचे समाधान करण्यासाठी म्हणाले, ''असे जरी असले तरी कुणीही आम्हाला काहीही प्रश्न विचारला तरी आम्ही त्याचे उत्तर देऊ शकतो.''

कपिलला एकदम आनंद झाला.

||श्रीराम||

## आत्मा पडद्यासारखा असतो

सूरज जिज्ञासू मुलगा होता. आपले आजोबा ज्ञानी असल्याने ते आपल्या शंकांचे निरसन यथायोग्य व समाधानकारक करतील अशी त्याची खात्री होती. लहानपणापासूनच तो महाराजांना प्रश्न विचारायचा व महाराजही त्याचे योग्य ते समाधान करायचे. सात–आठ वर्षांचा असताना त्याने महाराजांना, ''आत्मा म्हणजे काय ?'' असा प्रश्न विचारला होता. महाराजांनीही त्याच्या वयाला पटेल आणि बुद्धीत रुजेल असेच उत्तर दिले. ते म्हणाले, '' तू सिनेमा बघतोस ना ?'' ''होय'' सूरज उत्तरला. महाराज म्हणाले, ''तिथे सिनेमा पडद्यावर दिसतो. त्या पडद्यावर युद्धही होतं आणि लग्नही लागतं. सिनेमा बंद होतो तेव्हा पडदा जसा असतो तसाच होतो. आत्मा त्या पडद्यासारखा आहे. घटना घडतात पडद्यावर, पण त्याचा पडद्याशी काही संबंध नसतो.''

वेदांताची कुठलीही कठीण भाषा न वापरता महाराजांनी त्याला 'आत्मा म्हणजे काय' हे समजावून सांगितले.

**महाराज हे विद्वान पंडित आणि ब्रह्मसाक्षात्कारी महापुरुष होते. तरीही, मुलांच्या बौद्धिक पातळीवर येऊन त्यांना समजावून सांगणं हे त्यांचं वैशिष्ट्य होतं. पालकांनी आपल्या मुलांना कसे समजावून सांगावे, ह्याचा हा उत्तम परिपाठ आहे.**

## ॥श्रीराम॥

## असे होते महाराज !

'अभ्यासाचेनि प्रगट व्हावे' हे समर्थ वचन महाराजांनी अक्षरश: आचरणात आणले होते. अध्ययनाकडे त्यांचे विशेष लक्ष असे.

मुलांनो, घरात कितीही गडबड असली, माणसांचा राबता असला तरी महाराज एका कोपऱ्यात बसून अध्ययन शांतपणे करीत असत. एक घटना अशी आहे की, वाडीला महाराजांचे उपाध्याय होते. त्यांचा मुलगा सातवीत होता. तो पहाटे चार वाजता उठून अभ्यास करायचा. महाराजांना त्याचे खूप कौतुक वाटे. त्याच्या पुढील शिक्षणासाठी स्वत: महाराजांनी बँकेत त्याच्या नावाने पाच हजार रुपये ठेवले.

महाराज म्हणत, ''विचार सुद्धा, ज्याची योग्यता आहे, त्याचे ऐकावे. इतरांचे ऐकू नयेत. तो जे सांगेल ते करावे. काहीही म्हणाले तरी तो सांगेल तेच बरोबर आहे. तेच करावे. श्रीकृष्णांनी अर्जुनाला 'तुला युद्धच केले पाहिजे,' असं सांगितलं. म्हणजे आत्मज्ञान नको असा अर्थ नाही. पण त्यावेळी युद्धच केलं पाहिजे.''

॥श्रीराम॥

## असं सांगत महाराज !

सुटीचे दिवस होते. आमोद, अश्विन आणि सूरज यांची सुट्टीची दंगामस्ती चालली होती. एक दिवस महाराजांनी रात्री त्या तिघांनाही बोलावलं. लिहिलेली पत्र दाखवली व सांगितलं, ''उद्या सकाळच्या डाकेला ही पत्र जाऊ द्या.'' मुलं ''हो हो'' म्हणाली. महाराज पुन्हा पत्र लिहिण्यात गर्क झाले.

सकाळ झाली. तिघांनीही दूध घेतलं आणि बाहेरच्या खोलीत पलंगावर ''बदाम सात''चा डाव मांडून बसले. त्या डावात मुलं इतकी रंगली की पावणेदहा केव्हा वाजले, हे समजलच नाही. महाराज बाहेर आले. म्हणाले, ''पत्र टाकलीत कां?'' ''नाही. विसरलो!'' महाराज रागावले, ''काल रात्री सांगितलेली गोष्ट सकाळी लक्षात येत नाही? रोज प्रज्ञावर्धन स्तोत्र म्हणत जा.''

## *श्रीप्रज्ञावर्धनस्तोत्रम्

**अस्य श्रीप्रज्ञावर्धनस्तोत्रमंत्रस्य सनत्कुमार ऋषि:, स्वामी कार्तिकेयो देवता, अनुष्टुप् छंद: मम सकलविद्यासिध्यर्थं जपे विनियोग:**

**॥श्री स्कंद उवाच॥**

**योगीश्वरो महासेन: कार्तिकेयोऽग्निनंदन:।**
**स्कंद:कुमार:सेनानी:,स्वामी शंकरसंभव:॥१॥**
**गांगेयस्ताम्रचूडश्च, ब्रह्मचारी शिखिध्वज:।**
**तारकारिरुमापुत्र: क्रौंचाराति: षडानन: ॥२॥**
**शब्दब्रह्मस्वरुपश्च, सिद्ध: सारस्वतोगुरु:।**
**सनत्कुमारो भगवान् भोगमोक्षप्रद: प्रभु: ॥३॥**
**शरजन्मा गणाधीशपूर्वजो मुक्तिमार्गकृत् ।**
**सर्वागमप्रणेता च, वांछितार्थप्रदर्शन: ॥४॥**

||श्रीराम||

अष्टाविंशति नामानि,मदीयानि च  यः पठेत्||
प्रत्यूषे श्रद्धया युक्तो मूको वाचस्पतिर्भवेत् ||५||
महामंत्रमयानीती, मम नामानि कीर्तयेत् |
महाप्रज्ञामवाप्नोति नात्र कार्या विचारणा ||६||

(इति श्रीस्कंदपुराणे कार्तिकेयमाहात्म्ये प्रज्ञावर्धनस्तोत्रं संपूर्णम्)

||श्री कार्तिकेयार्पणमस्तु||

*हे स्तोत्र बुद्धीसंवर्धनासाठी आहे.



प.पू. श्रीदत्तमहाराज